**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा
आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक/वृत्तसंपादक

२६/१०/१६

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५

प्रसिध्दी पत्रक क्र.४३
दिनांक : २६.१०.२०१६

## मोबाईल ॲपद्वारे तिकीटाची व बसपास नुतनीकरणाची सुविधा

मुंबई,२६- बेस्ट उपक्रमातर्फे बसमधून प्रवास करणा-या प्रवाशांना मोबाईल ॲपद्वारे मोबाईल तिकीट तसेच मासिक व त्रैमासिक बसपासचे नुतनीकरण करण्याची योजना गुरुवार, दिनांक २७.१०.२०१६पासून कार्यान्वित करण्यात येणार आहे.

या योजनेच्या प्रारंभी प्रथम वातानुकूलित बसमार्गावरील प्रवाशांना रिडलर (Ridlr) या मोबाईल ॲपद्वारे तिकीटाची सुविधा देण्यात येणार आहे. तसेच या मोबाईल ॲपद्वारे सर्व आरएफआयडी (RFID) मासिक व त्रैमासिक पासधारकांना त्यांच्या बसपासाचे नुतनीकरणदेखील याद्वारे करता येणार आहे.

सदर मोबाईल ॲप रिडलर (Ridlr) मोबाईलमधील प्ले स्टोअरमध्ये उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सर्व प्रवासी जनतेला आवाहन करण्यात येत आहे की, बेस्ट उपक्रमातर्फे उपलब्ध करण्यात आलेल्या रिडलर (Ridlr) मोबाईल ॲप ह्या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

====